श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

वर्ष-७, अंक-१० | ऑक्टोबर-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८

## मानसशास्त्रज्ञ डॉ. विद्या भाटे यांची वालावलकर रुग्णालयाला भेट

डेरवणमध्ये भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात सध्या सुरू झालेल्या 'RGST/Dervan cohort' प्रकल्पाला नुकतीच पुणे येथील मानसशास्त्रज्ञ डॉ. विद्या भाटे यांनी भेट दिली आणि हॉस्पिटलमध्ये विविध वयोगटात सुरू असलेल्या प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना मानसशास्त्राशी संबंधित चाचण्यांबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

विद्या भाटे यांनी पुणे विद्यापीठातून 'मधुमेह रुग्ण व त्यांचे मानसशास्त्र' या विषयात संशोधन केले असून त्यांचे अनेक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रकाशित झाले आहेत.



*डॉ. विद्या भाटे आणि डॉ. सुवर्णा पाटील*

## मुलांची आरोग्य तपासणी व पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरे

'वालावलकर लड्डू गोपाल योजने'अंतर्गत ० ते ६ वयोगटतील मुलांची आरोग्य तपासणी व पालकांसाठी मार्गदर्शन शिबिरांचे नियोजन करण्यात येते. या योजनेत संगमेश्वर तालुक्यातील वांद्री, फणसेवाडी, आरवली, कसबा, फुणगुस या गावांमधे ही शिबिरे आयोजित करण्यात आली होती. या शिबिरांचा एकूण २०० ते २५० लोकांनी लाभ घेतला. या शिबिरात बालरोगतज्ज्ञ डॉक्टरांकडून लहान मुलांची तपासणी करण्यात आली आणि मोफत औषध वाटपही करण्यात आले. तसेच पालकाना तज्ज्ञ डॉक्टरांनी मुलांच्या आरोग्य व आहाराबद्दल मार्गदर्शन केले.



*फुणगुस येथील शिबिरात बालकांची आरोग्य तपासणी*



*कसबा येथील आरोग्य शिबिर*

## डॉ. पुनित छाजेड, बालरोग नेफ्रोलॉजिस्ट यांची वालावलकर रुग्णालयाला भेट

रविवार, दि. १५-०९-२०१९ रोजी मुंबई येथील डॉ. पुनित छाजेड, बालरोग नेफ्रोलॉजिस्ट यांनी वालावलकर रुग्णालयाला भेट दिली व रुग्णाची तपसाणी केली. डॉ. पुनित छाजेड कूपर हॉस्पिटल मुंबई येथे बालरोग नेफ्रोलॉजिस्ट या विषयाचे व्याख्याता म्हणून कार्यरत आहेत. भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात दर महिन्याच्या तिसऱ्या रविवारी त्यांच्या उपस्थितीत बालरोग नेफ्रोलॉजी शिबिर असते.



*डॉ. पुनित छाजेड बालरोग नेफ्रोलॉजिस्ट रुग्ण तपासणी करताना*

## वालावलकर रुग्णालयात इंग्लंडहून ॲनेस्थेटिस्ट प्रशिक्षणार्थी

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात परदेशातून अनेक डॉक्टर्स सेवा करण्याकरिता येत असतात. या महिन्यात रुग्णालयात इंग्लंडहून दोन तज्ज्ञ डॉक्टर्स सेवा देण्याकरिता आल्या आहेत. डॉ. ॲबीगल हार्पर आणि डॉ. ॲना यांनी न्यू कॅसल विद्यापीठातून एम.बी.बी.एस., माऊंटन मेडिसिनमधील डिप्लोमा, लेस्टर युनिव्हर्सिटी आणि रॉयल कॉलेज ऑफ ॲनेस्थेटिस्टमधून प्राथमिक एफ.आर.सी.ए. पूर्ण केले आहे. भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात ॲनेस्थेटिस्ट प्रशिक्षणार्थी म्हणून त्या आपली सेवा प्रदान करणार आहेत.

## डेरवण शाळेतील विद्यार्थ्यांना रोबो तयार करण्याचे प्रशिक्षण

'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' संचालित इंग्रजी माध्यमाची शाळा व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये 'अटल टिंकरींग लॅब'च्या उपक्रमांतर्गत National Robotics Championship 2019 and Innovation Cell, IIT Bombay यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच रोबोटिक्स कार्यशाळा व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.






या उपक्रमांत इ. ६ वी ते १२ वी मधील ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रत्येकी पाच विद्यार्थ्यांचे १८ गट करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी Line Follower Robot, Obstacle Avoider Robot व Wired Robot तयार केले. कार्यशाळेच्या शेवटी सर्व गटांच्या रोबोची स्पर्धा घेऊन तीन वेगवान रोबोच्या

गटांना विजयी घोषित करण्यात आले. सदर विजयी गटांची अंतीम राष्ट्रीय रोबोटिक्स स्पर्धा IIT Bombay येथे पार पडणार आहे.

रोबोटिक्स हे असे विज्ञान क्षेत्र आहे ज्यामध्ये भौतिक, गणितीय, इलेक्ट्रॉनिक्स, यांत्रिकी, विद्युतीय व संगणकीय आज्ञावली यांचे संयोजन आहे. नव्या वैज्ञानिक युगाच्या विद्यार्थ्यांनी या क्षेत्राचा अभ्यास करणे अतिशय महत्त्वाचे आहे. रोबोटिक्स कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांचे विविध वैज्ञानिक क्षेत्रांतील ज्ञान वाढीस लागले, मूलभूत संकल्पना स्पष्ट झाल्या, स्वत: करून बघितल्यामुळे व्यावहारिक अनुभव मिळाला, विषयातील अभिरुची तयार झाली, आत्मसात केलेल्या ज्ञानाची कसोटी घेता आली व रोबो तयार करताना त्यांची सर्जनशीलता व कल्पकता या कौशल्यांचा विकास झाला.





## शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये डेरवण प्रशालेचे नेत्रदीपक यश

महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनालय, पुणे व कोल्हापूर विभागीय क्रीडाकार्यालय यांच्या वतीने आयोजित तालुका, जिल्हा व विभाग पातळीवर विविध शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये डेरवण प्रशालेने घवघवीत यश संपादन केले.

सातारा येथे नुकत्याच विभागीय शालेय जलतरण स्पर्धा पार पडल्या. यामध्ये १४ वर्षे गटात तनिष्क कदम याने ५० मी. फ्री स्टाईल या प्रकारात द्वितीय तसेच ५० मी. बटर फ्लाय या प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त केला. श्रावणी वालावलकर हिने ५० मी. बटर फ्लायमध्ये प्रथम व ५० मी. फ्री स्टाईल प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त केला. १७ वर्षे वयोगटात यज्ञीत वारे याने ५० मी. फ्री स्टाईलमध्ये द्वितीय व १०० मी. फ्री स्टाईलमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्याचप्रमाणे १९ वर्षे वयोगटात प्रेमसागर चव्हाण याने ५० मी. बटरफ्लायमध्ये द्वितीय, १०० मी. बटरफ्लायमध्ये द्वितीय व २०० मी. बटरफ्लायमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व खेळाडूंची नागपूर येथे होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हास्तरीय शालेय योगासन स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगटात स्वरा गुजर हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला तसेच आर्टिस्टिक योग प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला. कोल्हापूर येथे होणाऱ्या विभागीय शालेय योगासन स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. तसेच 'फेडरेशन ऑफ इंडिया'शी संलग्न 'महाराष्ट्र योगा असोसिएशन', पुणे आयोजित राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत रौप्यपदक मिळवले.

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय टेबलटेनिस स्पर्धेमध्ये प्रशालेने १७ वर्षे वयोगटात उपविजेतेपद प्राप्त केले. यामधील सहभागी खेळाडू तेजस पोकळे, आदित्य पाटील, प्रणव कोकाटे, अर्णव शेट्ये, शुभम नरवणकर तसेच आदित्य पाटील या खेळाडूंची विभागीय निवड चाचणीसाठी निवड झालेली आहे.

चिपळूण तालुकास्तरीय ॲथलेटिक्स (मैदानी) स्पर्धेमध्ये विविध वयोगटात प्रावीण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंची नावे पुढील प्रमाणे – १४ वर्षे वयोगट – श्रावणी निगडे – १०० मी. व ४०० मी. धावणे या क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त. '४ X १०० मी. रिले' या प्रकारात मुले व मुली या दोन्ही संघानी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

१७ वर्षे वयोगट - श्रेयश बोकडे - ४०० मी. मध्ये प्रथम, सोहम गर्दे - २०० मी. मध्ये तृतीय, अथर्व राजेशिर्के - उंच उडीमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त. ४ X १०० मी. रिले प्रकारात मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक प्राप्त केला.

१९ वर्षे वयोगट - अमेय गुजर - उंच उडीमध्ये प्रथम व १०० मी. धावणे द्वितीय क्रमांक, चिन्मयी इंगवले - उंच उडीमध्ये प्रथम; पलक पटेल - लांब उडीमध्ये प्रथम, मसिहा डिंगणकर - १०० मी. धावणेमध्ये तृतीय क्रमांक प्राप्त. ४ X १०० मी. रिले या प्रकारात मुले व मुली या दोन्ही संघानी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेमध्ये वैयक्तिक क्रीडा प्रकारात प्रथम, द्वितीय आणि सांघिकमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त खेळाडूंची जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. डेरवण प्रशालेतील विद्यार्थ्यांचा खेळाकडे कल वाढत असून विविध क्रीडा प्रकारातील यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट'च्या क्रीडासंकुलातील सुसज्ज सुविधा व मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना लाभ होत आहे.

## बी. के. एल. वालावलकर स्मृती क्रॉस कंट्री स्पर्धेला उत्तम प्रतिसाद

'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलाच्या वतीने डेरवण येथे चौथ्या बी. के. एल. वालावलकर स्मृती क्रॉस कंट्री स्पर्धेचे दि. २८ ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते. जिल्हाभरातून विविध गटात ८०० धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे उद्घाटन 'शेखर मेडिको'चे व्यवस्थापकीय संचालक रवी ईपल्ली यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सर्वश्री अशोकराव जोशी, आंतरराष्ट्रीय धावपटू सुमंत वाईकर, रत्नागिरी जिल्हा संघटनेचे संदीप तावडे, महाराष्ट्र राज्य जिमनास्टिक्स प्रशिक्षक सचिन मांडवकर आणि शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धा १२, १४, १६ आणि १८ मुले व मुली अशा आठ गटात घेण्यात आल्या. सर्व गटातील विजेत्या पाच क्रमांकांच्या खेळाडूंना रोख रक्कम, पदक, प्रावीण्य प्रमाणपत्र उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आले. सर्व सहभागी खेळाडूंना कॅप आणि टी शर्ट आयोजकांच्या वतीने देण्यात आले.






**स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :**

**१२ वर्ष मुले (२ कि. मी.) –** १. कृष्णा राजे राजभोर (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) २. पार्थ गजानन चोघले (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) ३. श्रेयस शशिकांत ओकटे (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) ४. अजय शांताराम राजभर (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) ५. सुशांत मंगेश गोसावी (मालडेवाडी जिल्हा परिषद स्कूल, मालडेवादी).

**१२ वर्ष मुली (२ कि. मी.) –** १. आरोही राजकुमार पालखाडे ('एसव्हीजेसीटी' स्कूल, डेरवण) २. निकिता मुकेश अवधावल (रेगल पब्लिक स्कूल, कोंडे), ३. पल्लवी गणपत कुळे (जिल्हा परिषद स्कूल, पुरे) ४. तन्मयी संजय सुर्वे ('एसव्हीजेसीटी' स्कूल, डेरवण) ५. संचिता संजय सुर्वे (सह्याद्री इंग्लिश स्कूल, सावर्डे).

**१४ वर्ष मुले (३ कि. मी.) –** १. स्वराज संदीप जोशी (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) २. शुभम संदेश पंडित ('एसव्हीजेसीटी' स्कूल, डेरवण) ३. राज रवींद्र लोलम (दलवाई हायस्कूल, मिरजोळी) ४. समर्थ हनुमंत घाडगे (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) ५. सौरभ संजय शिंदे (लांजा हायस्कूल, लांजा).

**१४ वर्ष मुली (२ कि. मी.) –** १. पौर्णिमा अविनाश निवते (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) २. दिया दिनेश मोहिते (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) ३. सृष्टी संजय जड्याळ (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) ४. ज्योती शांताराम राजभोर (एन. डी. गोळे हायस्कूल, हर्णे) ५. श्रावणी सचिन निगडे ('एसव्हीजेसीटी' स्कूल, डेरवण).







**१६ वर्ष मुले (४ कि. मी.) –** १. अंकित अनंत चांदिवडे (नूतन माध्यमिक विद्यालय, काळूष्ट) २. दर्शन दीपक रामगडे (माध्यमिक विद्यालय, धामणसे) ३. सोहम दीपक पवार (दलवाई हायस्कूल, मिरजोळी) ४. संदेश सुनील म्हादलेकर (पाटपन्हाळे हायस्कूल, गुहागर) ५. राहुल सखाराम घोघले (न्यू इंग्लिश स्कूल, अबिटगाव).

**१६ वर्ष मुली (३ कि. मी.) –** १. साक्षी संजय जड्याळ (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) २. संजना संतोष हरावडे (न्यू इंग्लिश हायस्कूल, दापोली) ३. समीक्षा संतोष गुडेकर (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे) ४. क्रांती मिलिंद म्हसकर (नवी दिशा स्पोर्ट्स अकॅडमी, मंडणगड) ५. सदनिका अनंत गोडमडे (दलवाई हायस्कूल, मिरजोळी).

**१८ वर्ष मुले (६ कि. मी.) –** १. सागर अशोक म्हसकर (वालवई स्पोर्ट्स फाउंडेशन, वालवई) २. संकेत सीताराम भुवड (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ३. ओंकार अनंत चांदिवडे (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ४. अक्षय अनंत भुवड (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ५. प्रथमेश प्रदीप उदेग (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण).

**१८ वर्ष मुली (४ कि. मी.) –** १. योगिता धोंडू तांबडकर (गोविंदराव निकम हायस्कूल, सावर्डे), २. साक्षी सुभाष पवार (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ३. मानसी संदीप वाजे (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ४. अमिता अशोक गावडे (डी. बी. जे. कॉलेज, चिपळूण) ५. सर्वश्री श्रीकांत सागवेकर (‘एसव्हीजेसीटी’ स्कूल, डेरवण).




*स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी (डावीकडून) सर्वश्री बाळासाहेब काजरेकर, सचिन मांडवकर, प्रमुख पाहुणे रवी ईपल्ली, अशोकराव जोशी, सुमंत वाईकर आणि श्रीमती शरयू यशवंतराव*

# क्रीडासंकुलात विविध शालेय स्पर्धा

सप्टेंबर महिन्यात क्रीडासंकुलात विविध स्पर्धा संपन्न झाल्या. क्रीडासंकुलातील विविध सुविधांच्या पार्श्वभूमीवर गेले अनेक वर्ष क्रीडासंकुलात शालेय स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात येत आहे. गतवर्षी प्रमाणे याही वर्षी तालुकास्तरीय स्पर्धांबरोबरच जिल्हास्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. शालेय स्पर्धांचा हंगाम सुरू असून सप्टेंबर महिन्यात तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय स्पर्धांचा जल्लोष सुरू आहे.



दि. १६ ते १८ सप्टेंबर २०१९ या काळात क्रीडासंकुलात जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा झाल्या. बंदिस्त स्टेडियममध्ये घेण्यात आलेल्या खो-खो स्पर्धेमध्ये अनेक रोमांचक सामने पार पडले. दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी जिल्हास्तरीय टेबलटेनिस स्पर्धा क्रीडासंकुलातील मल्टीपर्पज हॉलमध्ये घेण्यात आल्या. रत्नागिरी जिल्ह्यात अतिशय गतिशील असणाऱ्या टेबल टेनिस खेळाची लोकप्रियता वाढत आहे.



त्याचबरोबर दि. १९ ते २१ सप्टेंबर २०१९ या काळात क्रीडासंकुलात जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा पार पडल्या. रत्नागिरी जिल्ह्यातील विविध तालुक्यातील संघांनी यात सहभाग नोंदविला होता. या संघाना व विशेष करून महिला संघाना प्रोत्साहन देण्यासाठी ग्रामीण महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. दि. २१ सप्टेंबर २०१९ रोजी क्रीडासंकुलात शालेय जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.



दि. २३ ते २५ सप्टेंबर २०१९ या काळात तालुकास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. चिपळूण तालुक्यातील विविध शाळांमधून स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी धावणे, थाळी फेक, गोळा फेक, उंच उडी, लांब उडी या क्रीडा प्रकारात आपले कौशल्य पणाला लावून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या स्पर्धेत एकूण १७०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धे साठी क्रीडाक्षेत्रातील मान्यवर, प्रशिक्षक, पंच, क्रीडाप्रेमी उपस्थित होते. या सर्वांनी संकुलातील सुविधांमुळे खेळाचा प्रचार व प्रसार होत असून खेळाडूंना उत्तम सुविधा असलेल्या संकुलात स्पर्धा खेळण्याचा अनुभव मिळत असल्याने समाधान व्यक्त केले.



**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com






**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून ऑक्टोबर २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ०४ ऑक्टो. | डॉ. सतेज सबनिस, युरॉलॉजिस्ट, मुंबई | मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| ०६ ऑक्टो. | डॉ. मंदार अक्कलकोटकर, पुण (आयुर्वेदिक) | तपासणी व आयुर्वेदिक उपचार |
| १२ ऑक्टो. | श्रवण यंत्र व वाचा उच्चार तज्ज्ञ | श्रवण यंत्र व वाचा उपचार |
| १६ नोव्हें. | डॉ. रोहिणी सामंत, मुंबई (रुमॅटॉलॉजिस्ट) | संधिवात व सर्व वातविकारावर उपचार |
| १९ ऑक्टो. | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| १९ऑक्टो. | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २० ऑक्टो. | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| २० ऑक्टो. | डॉ. अमीत साहू, मुंबई (एम.डी.रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| ---- | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ---- | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

- **डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
- **श्रवण यंत्र (बहिरेपणाचे मशिन) व वाचा उच्चार तज्ज्ञ (स्पीच थेरपिस्ट) दर महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी वालावलकर रुग्णालयात भेटतील**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०